# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

दिनांक 20/08/2020 (गुरूवार)
(सायंकाळ)

---

### विनयभंग करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

. पो.स्टे. पारशिवणीः– दिनांक 01/08/2016 चे 23.39 वा. दरम्यान फिर्यादी यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. पारशिवणी येथे अप. क्र. 63/2016 कलम 354, 448, 506 भादवी सहकलम 8 बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

. दिनांक 01/08/2016 चे 16.00 वा. सुमारास वय 15 वर्ष पिडीत /फिर्यादी हि आपले घराचे अंगणात भांडे घासत असतांना आरोपी नामे राहुल सुधाकर कुंभरे वय 20 वर्ष रा. बचेरा तालुका पारशिवणी जिल्हा नागपूर हा तिच्या अंगणात येवुन तिचे मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला. तसेच आरोपीने तिला शिवीगाळ करून जिवाने मारण्याची धमकी दिली. आरोपीला दिनांक 02/08/2016 चे 02.20 वा. दरम्यान अटक करण्यात आली.

. सदर प्रकरण्याचे तपास तत्कालीन पोलीस उपनिरीक्षक श्री. अनील राऊत, पो.स्टे. पारशिवणी यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. कोर्टामध्ये सादर केले. आज दिंनाक 20/08/2020 रोजी मा. कोर्ट विद्यमान न्यायाधीश श्री. के.जी. राठी न्यायाधिश, नागपूर यांनी वरील नमुद आरोपीला 1) कलम 354 भादंवि. सहकलम 7, 8 बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये 3 वर्ष शिक्षा व 1,000/–रु. दंड व दंड न भरल्यास 2 महिने साधी शिक्षा, 2) कलम 506 भादंवि मध्ये 3 महिने शिक्षा व 5,00/–रु. दंड व दंड न भरल्यास 1 महिना सक्त कैद अशी शिक्षा ठोठावली आहे.

. सरकारचे वतीने एपीपी श्रीमती. राऊंत यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अधिकारी म्हणुन सहायक पोलिस निरीक्षक श्री. संजय खोकले तर कर्मचारी सहा.फौज. श्री. शंकरराव तराळे, वासुदेव मस्के, किशोर निंबाळकर, भवानीप्रसाद मिश्रा पोहवा श्री. सुनील डोंगरे, शेखर मेश्राम, यांनी मदत केली आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर